# आपल्याला नक्की काय हवे?

## साक्षेप

■ पराग करंदीकर @ParagKMT

संसदेच्या नवीन वास्तूचे उद्घाटन उद्या होणार आहे. गेल्या दोन दिवसांमध्ये महाराष्ट्रातही महत्त्वपूर्ण प्रकल्पांचा प्रारंभ झाला. त्यातील समृद्धी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याला काल सुरुवात झाली. त्याचप्रमाणे तिसऱ्या मुंबईला जोडणाऱ्या सागरी सेतूच्या अंतिम टप्प्याचे कामही परवा सुरू झाले. एकूणच, निवडणुका जवळ येतील, तेव्हा अशा प्रकल्पांचे प्रारंभ वाढत जातील; किंबहुना अशी उद्घाटने होऊ लागली, की निवडणुकीचे पडघम वाजू लागले, असे समजायचे. निवडणुका येण्याआधीच्या चार वर्षांमध्ये ही कामे रेंगाळलेली का असतात, हा प्रश्न सगळ्यांना नेहमीच अस्वस्थ करतो.

नागपूरमध्येही असाच १५ दिवसांत विविध प्रकल्पांचा प्रारंभ झाला. पुण्यातील चांदणी चौकातील बहुचर्चित उड्डाणपूलही १५ जुलै रोजी सुरू होईल, अशी घोषणा झाली. त्याचप्रमाणे पुणे मेट्रोमधील एका मार्गाचा विस्तारही याच दरम्यान सुरू होत आहे. या साऱ्यामुळे तथाकथित विकासाची मानके दृश्य स्वरूपामध्ये दिसू लागतील. त्यांचा निवडणुकीमध्ये खरोखर किती उपयोग होतो, याचा वेगळा अभ्यास व्हावा. निवडणुका आल्या, की आपण काही तरी करून दाखविले, असे सांगण्याच्या हव्यासापोटी असा प्रकल्पांचा प्रारंभ करण्याची राज्यकर्त्यांची मानसिकता दिसते, एवढे मात्र खरे.

वर उल्लेख केलेले बहुतेक प्रकल्प गेल्या पाच-सहा वर्षांतले आहेत. कोव्हिडमुळे मधला अठरा ते वीस महिन्यांचा कालावधी गेल्याने, हे प्रकल्प लांबले असले, तरी जाहीर तारखेच्या जवळपास त्याचा प्रारंभ करण्यात राज्यकर्त्यांना यश आले आहे. दुसऱ्या बाजूला, वर्षानुवर्षे सुरू राहिलेलेही प्रकल्प आहेत. ते पूर्ण होण्याच्या तारखा जाहीर केल्या जातात; पण ती पाळल्या जात नाहीत. पुणे-सातारा महामार्ग असो किंवा मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गासारखी उदाहरणे असोत, दहा ते वीस वर्षे झाली; तरीही हे प्रकल्प पूर्ण होत नाहीत. इतकेच कशाला, पुण्याचा रिंग रोड, मेट्रो मार्गांचे पुढील काम, नवीन विमानतळ.. हे काही केले तरी पुढे सरकत नाहीत. विमानतळाच्या आश्वासनावर आता तिसरी निवडणूक लढवली जाईल. पुण्याच्या नदीकाठाचे सौंदर्य वाढविण्याचा प्रकल्प सुरू झाला आहे; पण स्वच्छ नदी प्रकल्पाला निधी मिळाल्यानंतर, त्याच्या निविदा प्रसिद्ध होण्यास सहा वर्षे लागली. कागदावर या काळात हे प्रकल्प पूर्ण होऊन कार्यरत होणे अपेक्षित होते; पण तसे घडले नाही.

हे नक्की का होते, असा प्रश्न सामान्यांच्या मनात म्हणूनच सतत येतो; किंबहुना नव्या प्रकल्पांची घोषणा झाली, की सामान्यांना धडकी भरते; कारण प्रकल्पांसाठी रस्ता खणला जातो किंवा बदलला जातो, अरुंद केला जातो. वाहतूक कोंडी वाढते. रोजच्या प्रवासातील मनस्ताप अधिक वाढतो. मुंबईत रेल्वे मार्गांवरील पुलांचे काम असेच अनेक वर्षे सुरू आहे. इतकेच कशाला, मुंबई महापालिकेच्या दारातील पूल पडल्यानंतर, पुन्हा उभा करण्यासाठी अपेक्षेच्या तिप्पट कालावधी लागला; त्यामुळे विकासाच्या या चिन्हांच्या निर्मितीबाबत सामान्यांच्या मनात धाकधूक असते. बरे, हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरही त्याची उपयुक्तता नक्की किती असेल, अशी नवीन धास्ती असतेच.



**निवडणुका आल्यावर वेगवेगळ्या प्रकल्पांच्या पूर्ततेची घाई एकीकडे आणि दुसरीकडे वर्षानुवर्षे रखडलेले प्रकल्प. एकीकडे मानकांनुसार, साच्यातच काम करण्याचा अट्टाहास, तर दुसरीकडे ते साचे मोडून काम करण्याची घाई. या साऱ्यातून नक्की काय साधायचे आहे आणि आपल्याला नक्की काय हवे आहे?**

अनेकदा अनेक प्रकल्प कोणाच्या तरी आग्रहासाठी होतात. त्यासाठी जनतेचा पैसा खर्च होतो. त्या प्रकल्पाचा प्रत्यक्षात काहीही उपयोग नसतो. तो उभा करताना तज्ज्ञांची मते विचारात घेतली जात नाहीत. मुंबई व पिंपरी-चिंचवडमध्ये अलीकडेच दोन सुंदर नाट्यगृहे उभी राहिली. ती वास्तुकलेचा उत्तम नमुना आहेत; पण या दोन्ही नाट्यगृहांमधील रंगमंचांची उभारणी सदोष आहे. एके ठिकाणी रंगमंचाच्या समोर चक्क पायऱ्या आहेत, तर एके ठिकाणी रंगमंच अर्धवर्तुळाकार केला आहे; त्यामुळे दोन्ही कडांना बसणाऱ्यांना रंगमंचाचा काही भाग दिसतच नाही. साहजिकच, या सुविधांचा अपेक्षित उपयोग होण्यामध्ये मर्यादा पडतील.

मुळात एखादा प्रकल्प आखला जातो, तेव्हा या सगळ्या बाबींकडे लक्ष का दिले जात नाही? जे सामान्य माणसांना कळते, ते या सर्व निर्मितीत सहभागी असणाऱ्यांना का कळत नसावे? पुण्यात भरवस्तीत असेच एक सुंदर नाट्यगृह आणि आर्ट गॅलरी उभी करण्यात आली आहे. त्याच आवारात पालिकेचा कचरा वाहतूक करण्याचा डेपोही आहे. या दोन गोष्टींची सांगड का व कोणी घातली असेल, त्यातून काय सुचवायचे असेल, याचा तर्क सांगणाऱ्याचा जाहीर सत्कारच करायला नको का?

सध्या 'जी ट्वेंटी' परिषदेच्या अंतर्गत राज्यात अनेक कार्यक्रम होत आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर या चार शहरांमध्ये सुशोभीकरण झाले. त्यावर काही कोटी रुपये खर्च झाले. पुणे व मुंबईत आणखी काही कार्यक्रम होणे अपेक्षित आहे. त्यासाठी पुन्हा सुशोभीकरण सुरू आहे. हे सुशोभीकरण म्हणजे फक्त दिव्यांच्या खांबाला रंगीत दिव्यांच्या माळा बांधणे किंवा तात्पुरत्या कुंड्या ठेवणे, शहरातील सार्वजनिक भिंतींवर या परिषदेचे चिन्ह व संदेश रंगविणे एवढेच मर्यादित राहिले आहे. त्याचा शाश्वत विकासाच्या दृष्टीने उपयोग शून्य. येणाऱ्या प्रतिनिधींनाही ही केवळ मलमपट्टी आहे हे जाणवण्याइतके ते बेढब आहे. असे नक्की का होते? सरकारी काम आणि सौंदर्यदृष्टी एकत्र नांदूच शकत नाहीत का?

पुण्यातील नदीच्या सुशोभीकरणाबद्दल कालच शैलजा देशपांडे, केतकी घाटे व मानसी करंदीकर यांचा अभ्यासगट मला भेटला. दोन्ही बाजूंना काँक्रीटचे कट्टे बांधून आणि प्रवाह चॅनेलमध्ये बंदिस्त करून नदी सुशोभित होणार नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. ते बरोबर आहे. उलट नदीच्या प्रत्येक किलोमीटरचा; तसेच तेथील प्रवाह व इतर नैसर्गिक गोष्टींचा अभ्यास करून त्याच्याशी सुसंगत विकास केला, तर तो अधिक योग्य ठरेल, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठी त्यांनी पदरमोड करून अहवालही तयार केला. हे काम सरकारनेच करावे, आम्हाला त्यात रस नाही, असेही या अभ्यासक सांगतात. त्याचप्रमाणे, असे कितीही सुशोभीकरण केले; पण त्यामध्ये शहराचे गटार सोडले, तर त्याला काहीही अर्थ राहणार नाही, असेही हा गट सांगतो. गेली दोन वर्षे ते अनेक राजकीय नेत्यांना, प्रशासकीय अधिकाऱ्यांना ही योजना दाखविण्यासाठी धडपडत आहेत. त्यांच्या प्रकल्पाचा खर्च सध्याच्या प्रकल्पाच्या निम्माही नाहीत. त्यांचे म्हणणे सर्वांना पटते; पण त्यावर कार्यवाही करण्याची इच्छाशक्ती कोणीच दाखवू शकत नाही. सगळ्यांना अहमदाबादमधील साबरमतीप्रमाणे सगळ्या नद्यांचे काठ सुशोभित करायचे आहेत. त्याची स्पर्धा आहे. त्याचा उपयोग, त्या नदीची प्रकृती, त्या शहराशी असलेले तिचे नाते याच्याशी कोणालाही काहीही देणेघेणे नाही. असे कसे चालेल?

दुर्दैव असे, की ज्या ठिकाणी ठरावीक मानके ठरवून काम व्हायला पाहिजे (उदा. नाट्यगृह, बसस्थानक, विमानतळ), तेथे स्वातंत्र्य घेऊन काम केले जाते. मग त्याची उपयुक्तता धोक्यात आली, तरी कोणाला देणेघेणे नसते. ज्या ठिकाणी स्थानिक परिस्थितीनुसार नियोजन करणे आवश्यक असते, तिथे मात्र मानकांनुसार सरधोपट काम. हे थांबले पाहिजे. सरधोपट विकासाचा हा गोरखधंदा काहीही देणारा नाही, उलट विनाशाकडे नेणारा आहे. फार दिवसांपूर्वी वाचले होते, की एक शिल्पकार सांगतो, पाषाणात शिल्प असतेच, मी अवतीभोवतीचा दगड बाजूला करतो. शिल्प आपोआप साकारते. आपण मात्र त्याच्या उलट वागतो आहोत. असलेल्या शिल्पांचा दगड कसा करता येईल, यासाठीच आपली धडपड चालू आहे का, हा प्रश्न आहे. उत्तर प्रत्येकाने शोधायचे आहे...

Parag.Karandikar@timesgroup.com